25-03-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 03/24/2025 10:00 PM Page 1



# आगोंद कारवाई विरोधात निषेध मोर्चा!

## सर्व ६७ व्यवसायांना टाळे : उपजिल्हाधिकारी मधू नार्वेकर यांना स्थानिक नागरिकांकडून निवेदन

■ टीम दैनिक हेराल्ड

आगोंद, दि. २४ : उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार आगोंद समुद्रकिनाऱ्यावर उभारण्यात आलेल्या ६७ बेकायदेशीर आस्थापनांवर सोमवारी कारवाई पूर्ण करण्यात आली. या पार्श्वभूमीवर, अल्केमिस्ट असेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी (दिल्ली स्थित) विरोधात स्थानिक नागरिकांनी काणकोण कदंब बस स्थानक ते उपजिल्हाधिकारी कार्यालय या मार्गावर शांततापूर्ण मूक मोर्चा काढला. मोर्चा संपल्यानंतर उपजिल्हाधिकारी मधू नार्वेकर यांना स्थानिक नागरिकांकडून निवेदन देण्यात आले.

या कारवाईची अंमलबजावणी २० मार्चपासून सुरू झाली होती आणि २४ मार्च रोजी ती पूर्ण झाली. यापूर्वी, १९ मार्च रोजी उच्च न्यायालयाने या आस्थापनांना सील करण्याचा आदेश दिला होता. २० मार्च रोजी सकाळी ११ वाजता ही प्रक्रिया सुरू करण्यात आली होती, मात्र शनिवारी (२२ मार्च) आणि रविवारी (२३ मार्च) सुट्टीमुळे कारवाई काही काळ स्थगित ठेवण्यात आली होती. अखेर, उपजिल्हाधिकारी मधू नार्वेकर यांच्या नेतृत्वाखाली नियोजित ६७ आस्थापनांवर टाळे ठोकण्यात आले.



कारवाईदरम्यान, मामलेदार मनोज कोरगावकर, वीज विभागाचे अभियंते व कर्मचारी, पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी, पंचायत सचिव अमोल नाईक गावकर तसेच स्थानिक पोलीस दल मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रशासनाने या आस्थापनांचा वीज आणि पाणीपुरवठा खंडित केला. तसेच, न्यायालयाच्या आदेशाची प्रत आस्थापनांवर चिकटवून त्यांना टाळे ठोकण्यात आले.

विशेष म्हणजे, आस्थापनांच्या मालकांनी कोणत्याही प्रकारचा विरोध दर्शवला नाही. काही व्यावसायिकांना आवश्यक सामान बाहेर काढण्यासाठी प्रशासनाने काही वेळ दिला, तर काहींनी स्वतःहून आस्थापना हटविण्याचा निर्णय घेतला.

न्यायालयाच्या आदेशांची अंमलबजावणी होत असताना, पर्यटन व्यवसायाशी संबंधित स्थानिक नागरिकांनी सोमवारी सकाळी १० वाजता शांततापूर्ण मूक मोर्चा काढला. काणकोण कदंब बस स्थानक ते उपजिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत काढण्यात आलेल्या या मोर्चात शेकडो स्थानिक नागरिक सहभागी झाले होते. त्यांनी हातात फलक घेत निषेध नोंदवला.

मोर्चानंतर, अल्केमिस्ट असेट रिकन्स्ट्रक्शन कंपनीकडून स्थानिक भागधारकांना होणाऱ्या त्रासाविरोधात निवेदन देण्यात आले. निवेदन सादर करणाऱ्यांमध्ये शॅक ओनर्स असोसिएशनचे अध्यक्ष धर्मेश सगलाशनी, आगोंद सरपंच निलेश पागी, सूरज नाईक गावकर, बरसात नाईक गावकर, नगरसेवक सायमन रिबेलो, शुभम कोमरपंत, हेमंत नाईक गावकर, धीरज नाईक गावकर, पंचसदस्य रामनाथ वेळीप आदींचा समावेश होता.

काणकोण शॅक ओनर्स संघटनेने स्पष्ट केले की, हा निषेध सरकार किंवा त्यांच्या यंत्रणांविरोधात नसून अल्केमिस्ट असेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी व अमन गुप्ता यांच्या कारवाईविरोधात आहे. संघटनेचे सदस्य सूरज नाईक गावकर म्हणाले की, आस्थापनांकडे सर्व परवाने असूनही ही कारवाई करण्यात आली आहे. हा लढा आम्ही कायदेशीर मार्गाने लढणार आहोत. विधानसभेतील ४० आमदारांनी याविषयी आवाज उठवावा व कायदेशीर आस्थापनांना संरक्षण द्यावे. हा लढा दिल्लीकर विरुद्ध गोवेकर आहे.

माजी आमदार विजय पै खोत, सामाजिक कार्यकर्ते शांताजी नाईक गावकर, जनासेन प्रमुख जनार्दन भंडारी, प्रशांत पागी, नगरसेवक शुभम कोमरपंत, सायमन रिबेलो, माजी पोलीस अधीक्षक महेश नाईक गावकर, माजी नगराध्यक्ष राजेंद्र देसाई आणि हेमंत नाईक गावकर यांनी या आंदोलनाला पाठिंबा दर्शवला.

गोवा फॉरवर्ड पक्षाचे विकास भगत म्हणाले की, ४० वर्षांपूर्वी या भागात जमिन खरेदी करण्यात आली, मात्र कायदेशीर प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी वेळ लागला. आम्हाला कासव संवर्धनाचे धडे दिल्लीकरांनी देण्याची गरज नाही. आमच्यासाठी कासव पूजनाचा एक भाग आहे. येथील तरुण व्यावसायिकांनी कर्ज काढून मोठी गुंतवणूक केली आहे, मात्र २४ तासांत बंद करण्याचा आदेश म्हणजे अतीच आहे.

आगोंद सरपंच निलेश पागी म्हणाले की, आम्ही पर्यावरणाच्या संवर्धनासाठी नेहमीच प्रयत्नशील आहोत. सरकारने ५ हजार स्थानिकांचे रोजगार हिरावून घेऊ नये.शॅक ओनर्स असोसिएशनचे अध्यक्ष धर्मेश सगलाशनी म्हणाले की हा लढा एका परप्रांतीय मल्टिनॅशनल कंपनीविरोधात आहे. आम्ही न्याय मिळेपर्यंत संघर्ष सुरूच ठेवू.

## निवडक

### साळ येथील राष्ट्रोळी देवाचा रविवारी वर्धापनदिन

■ टीम दैनिक हेराल्ड



**साळ, दि. २४** : साळ येथील राखणदार श्री राष्ट्रोळी देवाचा २0वा वर्धापनदिन सोहळा रविवार दि. ३0 रोजी गुढीपाडव्याचा औचित्य साधून साजरा करण्यात येणार आहे. श्री महादेव भुमका मंदिरात सकाळी १0 धार्मिक विधी ग्राम पुरोहित यांच्या नेतृत्वाखाली हरिपाठ वाचन करण्यात येईल. तसेच यजमानपद देहशुद्धी करण्यात येईल.म्हारींगण मंदिरात होमयज्ञ केला जाईल. सकाळी ११ वाजता श्री धवडा–राष्टोळी व श्री राष्ट्रोळी यांना हाक मारून शब्दराखण घेण्यात येणार आहे. श्री राष्ट्रोळी चरणी श्री सत्यनारायण महापूजा सादर करण्यात येईल. यजमानाचे देह शुध्दीकरण, तीर्थप्रसाद, महाप्रसाद, होणार आहे. भक्तभाविकांची सांगणे बोलणे देवास करण्यात येईल. ठिक संध्याकाळी ५:00 वाजता शिवशक्ती भजनी मंडळ साळ – मधलावाडा याचा भजनी कार्यक्रम सादर होणार आहे. त्यानंतर ७ वाजता साळ बद्रर्स साळ या संघाकडून खास आमंत्रित गोव्यातील सुप्रसिद्ध गायक श्री मोहनदास पोळे या संघाचा भजनी कार्यक्रम सादरीकरण होणार आहे. श्रीची तळीची व फळावळाची पावणी झाल्यानंतरठिक रात्री ९ वाजता श्री देवी माऊली दशावतार मंडळ इन्सुली याचा सहस्त्रनागपाश अर्थात राजा धर्मवीर हा नाटयप्रयोग सादर होईल. सोमवार दि. ३१ रोजी देवास आव्हानत्मक सांगणे देऊन ९ वाजता परेश, बाबनी व सुनील परवार याच्या आग्रहाखातीर चेंदवणकर दशावतार नाटयमंडळ कवठी याचा बम्हशाप हा नाटयप्रयोग सादर होईल. भाविकांनी कार्यकमाचा लाभ घ्यावा, असे बाबनी अर्जुन परवार यानी कळविले आहे.

---

### झांट्ये महाविद्यालयाचा उद्या बक्षीस वितरण सोहळा

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. २३** : नारायण झांट्ये कॉलेज ऑफ कॉमर्स, डिचोलीच्या वार्षिक बक्षिस वितरण सोहळ्याचे आयोजन येत्या बुधवार दि. २६ रोजी आयोजन केले आहे, अशी माहिती प्राचार्य डॉ. राजेंद्र कुंभारजुवेकर यानी दिली.

सदर सोहळा कॉलेजच्या सेमिनार सभागृहात सकाळी १ वाजता सुरू होई होईल. या सोहळ्याला वेदांता कंपनी च्या आयर्न ओर गोवाचे डेप्युटी सी.ई.ओ धिरज कुमार जगदिश हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असतील. तसेच कॉलेजचे चेअरमन तसेच माजी आमदार प्रवीण झांट्ये, प्राचार्य डॉ. राजेंद्र कुंभार जुवेकर, उपप्राचार्य डॉ. राजेश आमोणकर, विद्यार्थी मंडळाच्या अध्यक्षा प्रा. आलिशा तावारिस, पालक शिक्षक संघटनाचे पदाधिकारी, माजी विद्यार्थी संघटना पदाधिकारी उपस्थित असतील. यावेळी विद्यार्थ्यांनी चालू वर्षात जिकलेल्या बक्षिसांचे वितरण होईल तसेच मागील वर्षी परिक्षेत पाहिल्या क्रमांक पटकावलेल्या विद्यार्थ्यांना बक्षिसे वितरीत केले जाईल.

---

### फोंड्यात उद्या खंडित वीजपुरवठा

■ टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. २४** : फोंडा येथील सह्याद्री ट्रान्सफोरमरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने बुधवार दि. २६ रोजी सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत दुर्गाभाट आणि सभोवतालच्या भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

---

### फोंडा येथील राजकृष्ण भागात २७ रोजी खंडीत वीजपुरवठा

■ टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. २४** : फोंडा येथील राज कृष्णा १ आणि २ ट्रान्सफोरमरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने गुरुवार दि. २७ रोजी सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत राज कृष्णा टॉवर, कामत नर्सिंग होम आणि सभोवतालच्या भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

---

### खोर्ली भागात आज खंडित वीजपुरवठा

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २४** : ११ केव्ही मळार फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने मंगळवार दि. २५ रोजी सकाळी ९.३0 ते दुपारी २ वाजेपर्यंत सह्याद्री, विजयनगर, मिलरॉक१ आणि २ आणि खोर्ली गावाच्या सभोवतालच्या भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

---

### राष्ट्रीय महामार्ग -६६च्या सर्व्हिस रस्त्यांवर एकमार्गी वाहतूक

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २४** : सार्वजनिक बांधकाम खात्याच्या रस्ता विभागाने पत्रादेवी ते बांबोळी राष्ट्रीय महामार्ग–६६ च्या पत्रादेवी ते जुवारी पूल पर्यंतच्या सर्व्हिस रस्त्यांवर एकमार्गी वाहतूक अधिसूचित केली आहे.

---

### राज्यपालांहस्ते कर्करोग, डायलिसिस रुग्णांना आर्थिक मदतीचे वितरण

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २४** : राज्यपाल श्री. पी. एस. श्रीधरन पिल्लई यांनी राजभवनातील दरबार सभागृहात आयोजित कार्यक्रमात कर्करोग आणि डायलिसिस रुग्णांना आर्थिक मदतीचे वाटप केल्यानंतर बोलताना मानवतेची सेवा हीच ईश्वराची सेवा आहे, असे म्हटले जाते, मानव म्हणून, दुःखात असलेल्या आणि दुःखात जगणाऱ्या लोकांना मदत करणे हे आपले कर्तव्य आहे असे सांगितले. राज्यपालांनी त्यांच्या निधीतून आर्थिक मदत वितरीत केली. यावेळी त्यांनी सुमारे ३७ लाभार्थ्यांना प्रत्येकी २५000 रुपयांचे आर्थिक मदतीचे धनादेश सुपूर्द केले. राज्यपालांनी पुढे गोव्याचे राज्यपाल असताना त्यांनी गोव्यातील प्रत्येक गावात फिरून कर्करोग आणि मधुमेहासारख्या आजारांनी ग्रस्त असलेल्या लोकांना भेटल्याचे सांगितले. हे लोक गंभीर उपचार घेत आहेत आणि त्यांना अनेकदा मदतीची आवश्यकता असते असे ते म्हणाले. राज्यपालांनी देण्यात येणारी मदत ही तुटपुंजी आहे परंतु त्यामुळे त्यांच्या उपचारांचा खर्च भागविण्यास मदत होईल, अशी आशा व्यक्त केली. त्यांनी लाभार्थ्यांना आजारावर मात करण्यासाठी आत्मविश्वास आणि मनोबल मजबूत ठेवण्याचा सल्ला दिला. मानवतेच्या सेवेसाठी चॅरीटी संस्थांचे कौतुक करून राज्यपालांनी राज्यभरातील विविध चॅरीटी संस्थांना राजभवनच्या निधीतून एक लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली असल्याचे सांगितले. राज्यपालांचे सचिव एमआरएम राव, आयएएस यांनी यावेळी विद्यमान राज्यपाल श्री. पिल्लई यांनी गोव्यात सर्वत्र प्रवास केला असून चॅरीटी संस्थांनाही भेटी दिल्या आहेत, असे सांगितले. भेटींदरम्यान त्यांनी सामान्य लोकांशी व पुनर्वसन केंद्रांमधील लोकांशीही संवाद साधला आहे याव्दारे मानवतेबद्दल त्यांची काळजी दिसून येते. आज देण्यात आलेली आर्थिक मदत राज्यपालांच्या निधीतून देण्यात आली आहे असेही त्यांनी सांगितले. राज्यपालांचे अतिरिक्त सचिव संजीव गावस देसाई, लाभार्थ्यांचे नातेवाईक, राजभवनाचे कर्मचारी या कार्यक्रमाला उपस्थित होते.

---

### कुडतरी भागाज आज खंडित वीजपुरवठा

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २४** : वेतने कुडतरी फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने मंगळावार दि. २५ रोजी सकाळी ८ ते दुपारी ३वाजेपर्यंत वेतने आणि उंजिरी भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

त्याचप्रमाणे रोवलें फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने २६ मार्च २०२५ रोजी सकाळी ८ ते दुपारी ३ वाजेपर्यंत ग्रान्ट रूंबर्डे भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

# काँग्रेस स्वबळावर लढणार : अंजली निंबाळकर

■ टीम दैनिक हेराल्ड

**म्हापसा, दि. २४** : आगामी गोवा विधानसभा निवडणुकीत काँग्रेस कोणत्याही पक्षाशी युती करणार नाही, अशी स्पष्ट भूमिका अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या सचिव व गोवा सह–प्रभारी अंजली निंबाळकर यांनी रविवारी पुन्हा एकदा मांडली. पक्षाच्या विचारसरणीशी प्रामाणिक राहणाऱ्या उमेदवारांना संधी देण्याची काँग्रेसची कटिबद्धता असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

म्हापसा येथे शहीद दिना'निमित्त आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी भाजप सरकारच्या कार्यपद्धतीवर टीका करताना त्यांनी भ्रष्टाचार, जमीन बळकावणे, बदलत्या जमिनींचे स्वरूप, पैशांच्या बदल्यात नोकऱ्या, तसेच राज्यातील कायदा आणि सुव्यवस्थेचा बिघडलेला ढाचा या मुद्द्यांवर प्रखर टीका केली. राज्यातील जनता या वाढत्या समस्या पाहून जागरूक झाली आहे आणि त्यांना काँग्रेस हाच एकमेव पक्ष वाटतो जो त्यांच्यासाठी लढतो असे निंबाळकर म्हणाल्या.

राज्यातील कार्यकर्त्यांशी झालेल्या संवादादरम्यान कोणत्याही पक्षासोबत युती न करण्याची भूमिका समोर आली असल्याचे निंबाळकर यांनी सांगितले. सर्वजण सांगत आहेत की युती नको. गोव्यातील जनतेचा आवाज आम्ही नक्कीच ऐकू आणि पक्षाचा हायकमांड योग्य तो निर्णय घेईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

आम आदमी पक्ष (आप) आणि तृणमूल काँग्रेस (टीएमसी) यांना भाजपची बी–टीम' संबोधत, त्यांच्या उपस्थितीमुळे धर्मनिरपेक्ष मतविभाजन होऊ शकते आणि त्याचा फायदा सत्ताधारी भाजपला होऊ शकतो, असा इशाराही त्यांनी दिला.हे पक्ष निवडणूक लढवण्यासाठी गोव्यात आले, तर त्याचा फायदा दिल्लीला जाईल. मात्र, गोव्यातील जनता भाजप, आप आणि तृणमूल काँग्रेसला त्यांच्या जागी बसवण्यास तयार आहे असे निंबाळकर म्हणाल्या.

भूतकाळातील राजकीय घटनांचा स्वीकार करत,काही काँग्रेस आमदारांनी सत्ता आणि पैशांसाठी पक्ष सोडल्याची कबुली निंबाळकर यांनी दिली.मात्र,पक्षाने या घटनांमधून धडा घेतला असून,आता संघटन मजबूत करण्यावर भर दिला जात असल्याचे त्यांनी सांगितले.

या निवडणुकीत आम्ही निष्ठावान उमेदवार निवडणार आहोत. काँग्रेसला २५ ते २७ आमदार निवडून आणण्याचा आत्मविश्वास आहे आणि त्यातील प्रत्येक आमदार पक्षाशी एकनिष्ठ राहील, याची खात्री आम्ही करू,असे त्यांनी ठामपणे सांगितले. या कार्यक्रमाला काँग्रेस महिला प्रदेशाध्यक्षा प्रतीक्षा नार्वेकर, गोवा प्रदेश काँग्रेस कमिटीचे वरिष्ठ उपाध्यक्ष एम. के. शेख, तसेच काँग्रेसच्या मीडिया विभागाचे अध्यक्ष अमरनाथ पणजीकर आदी नेते उपस्थित होते.

# मध्य आशियाई युवा प्रतिनिधी मंडळाने राज्यपालांची घेतली भेट

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २४** : मध्य आशियाई युवा प्रतिनिधी मंडळाने राज्यपाल पी. एस. श्रीधरन पिल्लई यांची सोमवारी राजभवनातील जुना दरबार हॉल येथे भेट घेतली. हे शिष्टमंडळ तीन दिवसांच्या गोवा दौऱ्यावर असून, भारत आणि मध्य आशियाई राष्टांमधील युवा सहकार्य, सांस्कृतिक देवाणघेवाण आणि राजनैतिक संबंध अधिक दृढ करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे.

प्रतिनिधींशी संवाद साधताना राज्यपाल म्हणाले,भारताची ओळख त्याच्या समृद्ध संस्कृती, इतिहास आणि जागतिक योगदानाच्या विविध पैलूंमुळे आहे. भारत नेहमीच कोणत्याही भेदभावाविना लोकांचे स्वागत करतो. तसेच, युवा देवाणघेवाण कार्यक्रमांमुळे भारत आणि मध्य आशियाई देशांमधील प्रादेशिक शांतता, मैत्री आणि आर्थिक भागीदारी मजबूत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी उपस्थित असलेले गोव्याचे क्रीडा मंत्री गोविंद गावडे म्हणाले की, शिष्टमंडळाची भेट भविष्यातील सहकार्यासाठी महत्त्वाची असून, सांस्कृतिक समज, नेतृत्व विकास आणि आंतरराष्ट्रीय सहकार्याला गती देणारा हा उपक्रम ठरेल.त्यांनी यावेळी कलात्मक आणि सांस्कृतिक विविधतेचे महत्त्व अधोरेखित करत, समावेशकता, सहिष्णुता आणि परस्पर समज वाढवण्यावर भर दिला.

कल्पनाशक्ती नवोपक्रमांना चालना देते आणि तरुणांना सर्जनशील विचारांद्वारे भविष्य घडवण्याची संधी प्रदान करते, असेही गावडे यांनी सांगितले.

या कार्यक्रमाला राज्यपालांचे सचिव एम. आर. एम. राव (आयएएस) आणि भारत सरकारच्या युवा व्यवहार व क्रीडा मंत्रालयाच्या अवर सचिव मंजुळा जुनेजा उपस्थित होते.

कझाकस्तान, ताजिकिस्तान, किर्गिस्तान, उझबेकिस्तान आणि तुर्कमेनिस्तान या पाच मध्य आशियाई देशांमधील १00 सदस्यीय युवा शिष्टमंडळाने या भेटीत सहभाग घेतला. भारत आणि मध्य आशियाई देशांतील युवकांमध्ये परस्पर समज आणि सहकार्य वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने आयोजित या कार्यक्रमात प्रत्येक देशाच्या प्रतिनिधींनी आपले अनुभव आणि भविष्यासंबंधीच्या आकांक्षा व्यक्त केल्या.

# खाटे, देळेतील निराकार देवाचा वर्धापनदिन साजरा

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २३** : निसर्गाच्या कुशीत वसलेल्या खाटे, देळे येथील श्री निराकार देवाचा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात व भाविकांच्या उपस्थितीत पार पडला. सकाळी पूजा धार्मिक विधी व त्यानंतर आरत्या, तीर्थ –प्रसाद, महाप्रसाद ही झाला. गावकऱ्यांबरोबरच भाविकांनी ही श्रींचे दर्शन घेऊन तीर्थ–प्रसादाचा लाभ घेतला. संध्याकाळी हिंदवी स्वराज्यासाठी छत्रपती संभाजी महाराजांनी दिलेले बलिदान, गाजवलेला पराक्रम, राष्ट्र व धर्मासाठी दिलेले योगदान यावर आधारित 'छावा' सिनेमा ही दाखवण्यात आला.



# कोकण रेल्वेच्या तीन नव्या स्थानकांना सरकारचा पाठिंबा

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २४** : कोकण रेल्वेच्या सारझोरा, नेवरा आणि मये या गावांमध्ये तीन नवीन रेल्वे स्थानके उभारण्याच्या प्रस्तावास गोवा सरकारने पाठिंबा दिला आहे. या प्रकल्पामुळे रेल्वेच्या कार्यक्षमतेत सुधारणा होईल तसेच उत्तर गोव्याशी जलद आणि सुलभ रेल्वे संपर्क प्रस्थापित होईल, असे सरकारचे म्हणणे आहे.

या प्रस्तावावर विधानसभेत सखोल चर्चा झाली. विरोधी पक्षांनी या स्थानकांच्या उभारणीला जोरदार विरोध दर्शवला. त्यांनी असा दावा केला की, स्थानिक नागरिकांनी पर्यावरणाच्या दृष्टीने या प्रकल्पाला विरोध केला आहे.तसेच,भविष्यात या मार्गाचा वापर कोळसा वाहतुकीसाठी केला जाऊ शकतो,अशी भीती त्यांनी व्यक्त केली.

मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी मात्र हा आरोप फेटाळून लावत स्पष्ट केले की, प्रस्तावित स्थानके फक्त प्रवासी वाहतुकीच्या सोयीसाठी आणि रेल्वे क्रॉसिंगच्या व्यवस्थापनासाठी आहेत. त्यांनी असेही सांगितले की,काणकोण ते पेडणे जलद रेल्वे संकल्पनेला या स्थानकांमुळे गती मिळेल आणि स्थानिक प्रवाशांना मोठा फायदा होईल.

प्रवाशांना उत्तम सेवा मिळावी यासाठी करमळी रेल्वे स्थानकावर थांबे वाढवण्याबाबत केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्याशी चर्चा केली जाईल, असेही मुख्यमंत्री सावंत यांनी सभागृहात आश्वासन दिले.

वाहतूक मंत्री माविन गुदिन्हो यांनी स्पष्ट केले की, ही स्थानके कोकण रेल्वेच्या कार्यक्षमतेत सुधारणा करण्याच्या व्यापक योजनेचा भाग आहेत आणि गोवा सरकारला हा प्रकल्प रोखण्याचा अधिकार नाही.हा प्रस्ताव नवीन नाही. कोकण रेल्वेच्या कामकाजात होणारा विलंब कमी करण्यासाठी ही योजना १९९८ मध्ये आखली गेली होती. अनेक विद्यमान रेल्वे मार्ग आणि ब्लॉक पूर्ण क्षमतेने कार्यरत असल्यामुळे अतिरिक्त स्थानकांची आवश्यकता निर्माण झाली आहे, असे गुदिन्हो यांनी सांगितले.

त्यांनी हे ही स्पष्ट केले की, नवीन स्थानके मुख्यतः क्रॉसिंगसाठी उभारली जात असून प्रवासी वाहतुकीसाठी त्यांचा वापर मर्यादित असेल.ही स्थानके विलंब टाळण्यासाठी आवश्यक आहेत आणि त्यांचे नियोजन शुद्ध तांत्रिक कारणांसाठी केले गेले आहे, असे ते म्हणाले.

या संदर्भात बोलताना गुदिन्हो यांनी कोकण रेल्वेच्या सुरुवातीच्या विरोधाची आठवण करून दिली.पूर्वी लोक कोकण रेल्वेला विरोध करत होते, पण आता ती मोठ्या प्रमाणावर वापरली जाते. या नव्या स्थानकांमुळे कार्यक्षमतेत मोठी सुधारणा होईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

# शिवोलीमध्ये नव्याने दुरुस्त केलेला रस्ता पुन्हा खोदला

ग्रेगरी डिसोझा
■ टीम दैनिक हेराल्ड

**शिवोली, दि. २४** : शिवोली येथील सेंट अँथनी चर्च ते मार्ना या एमडीआर –६ रस्त्यावर अवघ्या काही महिन्यांपूर्वी ११ केव्ही केबलटाकण्यात आली होती तसेच रस्त्यावर हॉटमिक्सचा नवा थर देण्यात आला होता. नागरिकांनी अखेर रस्त्याचे वारंवार होणारे खोदकाम थांबल्याने दिलासा मानला होता. मात्र, दुरुस्ती पूर्ण झाल्यानंतर केवळ २४ तासांतच हा रस्ता पुन्हा खोदण्यात आला, यामुळे स्थानिकांमध्ये आश्चर्य आणि संतापाची लाट उसळली आहे.

चौकशीअंती संबंधित कंत्राटदाराने माहिती दिली की, नवीन टाकण्यात आलेल्या केबलमध्ये बिघाड झाला असल्याने हे खोदकाम आवश्यक होते. मात्र, या प्रक्रियेदरम्यान पाण्याची पाईपलाईनही नुकसानग्रस्त झाली, त्यामुळे स्थानिकांना आणखी अडचणींचा सामना करावा लागत आहे.




या परिस्थितीमुळे प्रशासनाच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. ११ केव्ही केबलमध्ये बिघाड नक्की कसा झाला? हा प्रश्न अद्याप अनुत्तरित आहे. संबंधित यंत्रणांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून जबाबदारांवर कारवाई करणे आवश्यक आहे.

तसेच, केबल टाकण्याच्या प्रक्रियेत कोणती दक्षता घेतली गेली होती? यावरही विचार करण्याची गरज आहे.होल ड्रिलिंग मशीनचा वापर करून खोदकामाची आवश्यकता कमी करता आली असती का? तसेच, केबलवर खरा भार पडल्यावर भविष्यात पुन्हा अशा बिघाडांचे प्रमाण वाढणार का? या प्रश्नांची उत्तरे शोधणे महत्त्वाचे ठरणार आहे. सध्या वीज विभागाच्या नवीन उपकरणांच्या मदतीने बिघाड झालेल्या ठिकाणाचा शोध घेतला जात आहे, मात्र तोपर्यंत ग्राहकांना अपुऱ्या वीजपुरवठ्याचा फटका सहन करावा लागणार आहे. यावर निश्चित उपाययोजना केव्हा होईल, हे फक्त वेळच ठरवेल. या प्रकारामुळे सार्वजनिक बांधकाम विभाग, वीज विभाग आणि पाणीपुरवठा विभाग यांच्यातील समन्वयाचा अभाव पुन्हा एकदा स्पष्ट झाला आहे. जर या विभागांनी एकत्रितपणे नियोजनबद्ध कार्यपद्धती राबवली असती, तर केवळ काही महिन्यांत नव्याने दुरुस्त झालेला रस्ता पुन्हा खोदण्याची वेळ आली नसती. स्थानिक नागरिकांच्या मुख्य चिंता अशी आहे की, जर भविष्यात रात्रीच्या वेळी अशा प्रकारचा तांत्रिक बिघाड झाला, तर तो दुरुस्त होईपर्यंत अनेक तास ग्राहकांना अडचणींचा सामना करावा लागेल. प्रशासनाने अशा समस्यांवर तातडीने उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. अन्यथा, सुव्यवस्थित आणि नियोजनबद्ध पायाभूत सुविधा मिळण्याचे स्वप्न अद्याप अपूर्णच राहणार आहे.


